अमरावती सिटी 06-06-2024

दैनिक भास्कर समूहाचे वृत्तपत्र
दिव्य मराठी

# पर्यावरण संवर्धनासाठी बाभळीत वृक्ष लागवड



बाभळी परिसरात वृक्षरोपण करताना मजीप्राचे अधिकारी, आयवाचे सदस्य, विश्वराज एन्व्हायरमेंटचे कर्मचारी.

**प्रतिनिधी** | दर्यापूर

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण भांडार परिसर, बाभळी येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मंगळवारी ५ जूनला वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन, आयवा अमरावती, विश्वराज एन्व्हायरमेंट प्रा. लि. मुंबई यांच्या संयुक्त सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या संदर्भात देण्यात आलेल्या माहितीनुसार उपक्रमात आयवाचे मानद सचिव आनंद जवंजाळ, समिती सदस्य प्रदीप कोल्हे, आशिष टेकाडे, मजीप्राचे उपविभागीय अभियंता विजय शेंडे, शासकीय कंत्राटदार नितीन काळे यांच्यासह पर्यावरण स्नेही कार्यकर्ते राजेंद्र गायगोले, विनोद टेवरे, राजाभाऊ मुरतकर, संजय कोरडे, विजय पारडे, वसंत गोस्वामी तसेच विश्वराज इन्व्हायरमेंट कंपनी आणि महाराष्ट्र जीवन प्राधीकरणचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी देशी प्रजातीच्या ५० वृक्ष रोपट्यांची लागवड मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.

या सर्व वृक्ष रोपट्यांची जगवण्यासाठी आशिष टेकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वराज इन्व्हायरमेंट कंपनी प्रयत्न करणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी आयवा, डॉ. पंजाबराव देशमुख विचारमंच दर्यापूर, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण , विश्वराज इन्व्हायरमेंट कंपनी यांनी सर्वतोपरी सहकार्य केले, अशी माहिती आयोजकांच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे.